.docx

विभागीय स्तरावरील मंडळ अधिकारी संवर्गाच्या सुधारीत जेष्ठता याद्यांवर घेतलेल्या हरकतींचा तपशील

जिल्हा-ठाणे

| अ.क्र. | आक्षेप/हरकत घेणा-याचे नाव, पदनाम | जिल्हयाचे नाव | आक्षेप/ हरकती मध्ये नमुद केलेले मुद्दे | जिल्हाधिकारी यांचे मुद्देनिहाय अभिप्राय | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | |
| १ | श्री. अशोक पिराजी मधाळे,<br>मंडळ अधिकारी, मुंब्रा, ता.जि. ठाणे,<br>अर्ज दिनांक २१.०१.२०१६<br>अ.क्र.६४५ | ठाणे | मला तलाठी संवर्गातून मंडळ अधिकारी म्हणून ३१.०१.२०१३ रोजी प्रमोशन मिळाले आहे. मला नायब तहसिलदार म्हणून पदोन्नती देतावेळी **अपंग व अ.जा.** संवर्गातून देण्यात यावी ही विनंती. | श्री. मधाळे यांचे नावासमोर **(अ.जा.) अपंग** म्हणून शेरा लिहिणेस प्रस्तावित आहे.<br>नायब तहसिलदार संवर्गात पदोन्नती ही बाब मा. विभागीय आयुक्त कार्यालयाचे स्तरावरील आहे. | **आक्षेप मान्य**<br>आक्षेपानुसार अपंग म्हणून नोंद घेण्यात आली. |
| २ | श्री. कुमार पृथ्वीराज होगाडे,<br>मंडळ अधिकारी,<br>अपर जिल्हाधिकारी पालघर, मुख्यालय जव्हार, जि.पालघर<br>अर्ज दिनांक २१/०१/२०१६. | ठाणे | श्री. होगाडे यांचे नाव अ.क्र. ५८२ वर असुन रकाना क्र. ४ शासन सेवेत प्रवेश केल्याचा दिनांक ०१.०४.१९९८ व रकाना क्र.९ मध्ये शैक्षणीक अर्हता यामध्ये बी.ए. बीएड. अशी दुरूस्ती करणेबाबत विनंती आहे. | आक्षेप मान्य करुन रकाना क्र. ४ मध्ये सेवा प्रवेशाचा दिनांक ०१/०४/१९९८ अशी दुरुस्ती करण्यास प्रस्तावित आहे. तसेच रकाना क्र.९ मध्ये अर्जदाराने धारण केलेली शैक्षणिक पात्रता बी.ए.बी.एड. अशी दुरुस्ती करण्यास हरकत नाही. | **आक्षेप मान्य**<br>शासन सेवा प्रवेश दि.१.०४.१९९८ व रकाना क्र.९ मध्ये शैक्षणिक पात्रता बी.ए.बी.एड. अशी दुरुस्ती करण्यात आली. |
| ३ | श्री. कमळाकर विठ्ठल पाटील,<br>मंडळ अधिकारी, दहिसर, ता.जि.ठाणे<br>अर्ज दिनांक २५.०१.२०१६ | ठाणे | श्री. कमळाकर विठ्ठल पाटील यांचे नाव अ.क्र. ५७७ वर असुन जात प्रवर्ग इमाव असुन खुला असा नोंदविला आहे. तरी जात प्रवर्गामध्ये दुरूस्ती करणेबाबत विनंती आहे. | आक्षेप मान्य करुन जात प्रवर्गात दुरुस्ती करणेबाबत प्रस्तावित आहे. | **आक्षेप मान्य**<br>आक्षेपानुसार इमाव जात प्रवर्गात दुरुस्ती करण्यात आली. |

(तानाजी सत्रे)

विभागीय आयुक्त कोंकण विभाग

## विभागीय स्तरावरील मंडळ अधिकारी संवर्गाच्या सुधारीत ज्येष्ठता यादयांवर घेतलेल्या हरकतीचा तपशील

### जिल्हा - रायगड

| जे.या. अ.क्र. | आक्षेप/हरकत घेणा-यांचे नाव व पदनाम | आक्षेप/हरकती मध्ये नमूद केलेले मुद्दे | जिल्हाधिकारी यांचे मुद्देनिहाय अभिप्राय | शेरा |
|---|---|---|---|---|
| १२५ | श्री.बी.के.गायकवाड, नायब तहसिलदार, तहसिल कार्यालय शहापूर,जि.ठाणे (मुळ जिल्हा रायगड) | श्री.बी.के.गायकवाड, नायब तहसिलदार यांनी दि.१६/०७./२०१२ व ०४/१२/२०१५ रोजी अर्ज सादर करून, खालील प्रमाणे आक्षेप सादर केलेला आहे.<br>मी निवासी नायब तहसिलदार पेण येथे कार्यरत असून, माझ्या सेव पुस्तकामध्ये माझी जन्म तारीख ०१/०६/१९६० अशी जन्मनोंद झालेली असून, सदरची नोंद माझ्या शाळा सोडलयाचा दाखल्यावरून नोंदलेली आहे. मात्र प्रत्यक्षात माझी जन्मतारीख गांव नमुना नंबर १४ पाहता ती दिनांक २१/०३/१९६१ अशी आहे. सोबत तहसिलदार शहापूर यांचे कार्यालयाकडून प्राप्त उतारा जोडला आहे. तरी माझ्या सेवा पुस्तकामध्ये व जेष्ठता यादीमध्ये दुरूस्ती होण्यास विंनती केलेली आहे. | या कार्यालयाकडील पत्र क्र.मशा/ आस्था-१/अ८(१)/जा.नों.दु./गायकवाड/२०१५ दि.१७/०६/२०१५ अन्वये श्री.बी.के. गायकवाड, नायब तहसिलदार यांचा जन्म नोंद दुरूस्तीचा प्रस्ताव मा.विभागीय आयुक्त कार्यालयाकडे पुढील कार्यवाहीसाठी सादर करण्यात आलेला आहे. | **आक्षेप अमान्य**<br>जन्म तारखेबाबत सबळ पुरवा नसल्याने आक्षेप अमान्य करण्यात येत आहे. |
| ६१२ | श्री.एस.व्ही.साबळे, खनिकर्म निरीक्षक (मंडळ अधिकारी संवर्ग), जिल्हाधिकारी कार्यालय,रायगड (मुळ जिल्हा रायगड) | श्री.एस.व्ही.साबळे यांनी दि.१८/०१/२०१६ रोजी या कार्यालयाकडे अर्ज करून,सदर जेष्ठाता यादीवर खालीलप्रमाणे हरकत घेतली आहे. मी शारिरीकदृष्टा अपंग कर्मचारी आहे. माझे सेवा पुस्तरकात तशी नोंद आहे. यापुर्वीच्या तलाठी संवर्गाचे संयुक्त् जेष्ठता यादीमध्ये सन २००६ पासून अपंग कर्मचारी म्हणून नोंद आहे. परंतु अलिकडच्या जेष्ठंता यादीमध्ये व | श्री.एस.व्ही.साबळे,मंडळ अधिकारी यांनी या कार्यालयाकडून प्रसिध्द केलेल्या ज्ञापन दि.१४/१२/२०१५ व दि.०५/०१/२०१६ अन्वये प्रसिध्द केलेल्या जेष्ठता यादीवर आक्षेप घेतलेला नाही. तथापी, या कार्यालया कडून यापूर्वी प्रसिध्द केलेल्या मंडळ | **आक्षेप मान्य.**<br>आक्षेपानुसार श्री.साबळे यांचे नावासमोर अपंग म्हणून नोंद करण्यात आली. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | मा.विभागीय आयुक्त यांचेकडील प्रसिध्द जेष्ठता यादीमध्ये नोंद घेतलेली आहे. तरी सदर जेष्ठता यादीमध्ये अपंग कर्मचारी म्हणून नोंद घेण्यास विनंती आहे. | अधिकारी संवर्गाच्या जेष्ठता यादीमध्ये श्री.एस.व्ही. साबळे, मंडळ अधिकारी यांच्या नावासमोर अपंग कर्मचारी (अस्थिव्यंग) म्हणून नोंद आहे. तरी मा.विभागीय आयुक्त कार्यालया कडून प्रसिध्द झालेल्या ज्ञापन दि.१२/०१२ /२०१६ अन्वये प्रसिध्द केलेल्या मंडळ अधिकारी संवर्गाच्या जेष्ठता यादीमध्ये श्री.साबळे यांच्या नावासमोर अपंग कर्मचारी म्हणून नोंद घेण्यास हरकत नाही. सोबत त्यांचे अंपगाचे प्रमाणपत्र माहितीसाठी जोडण्यात येत आहे. | |

(तानाजी सत्रे)
विभागीय आयुक्त कोंकण विभाग

मंडळ अधिकारी संवर्गातील कर्मचा-यांची विभागीय पातळीवरील ज्येष्ठता सूचीवरील हरकतीबाबतचा तपशील

**जिल्हा सिंधुदुर्ग**

| अ.क्र. | आक्षेपहरकत/ घेणायांचे नाव व - पदनाम | आक्षेपहरकती/ मध्ये नमूद केलेले मुद्दे | जिल्हाधिकारी यांचे मुद्देनिहाय अभिप्राय | शेरा |
|---|---|---|---|---|
| १ | श्री.एकनाथ विष्णू नाईक, मंडळ अधिकारी, पुनर्वसन जिल्हाधिकारी कार्यालय सिंधुदुर्ग | दिनांक 17/06/2010 रोजीच्या विभागीय पदोन्नती समीतीचे बैठकीत तलाठी संवर्गातील सहा कर्मचा-यांचे प्रस्ताव पदोन्नती समीतीसमोर सादर करण्यात आले या प्रस्तावात सेवा जेष्ठताप्रमाणे माझा क्रमांक 05 होता त्यावेळी माझ्या विरुध फौजदारी प्रकरण चालू होते. तसेच विभागीय चोकशी प्रलंबीत असल्याने दिनांक 17/06/2010 दि. 07/04/2011 आणि दि. 26/02/2012 च्या विभागीय पदोन्नती समिती बैठकीत माझा मंडळ अधिकारी संवर्गात पदोन्नतीसाठी विचार झाला नाही. मी फौजदारी खटला व विभागीय चौकशीतून दोषमुक्त झाल्याने मला दिनांक 28/05/2014 च्या आदेशाने तलाठी संवर्गातून मंडळ अधिकारी पदावर पदोन्नती झाल्याने मी दिनांक 31/05/2014 रोजी पदावर हजर झालेलो आहे. परंतू दिनांक 16/06/2010 च्या विभागीय पदोन्नती समितीच्या बैठकीत समोरील प्रस्तावाच्या यादीतील क्रमांक 05 होता अ.क्र. 06 वर श्री. आर.सी.कुडाळकर यांना पदोन्नती देण्यात आलेली | मा.विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांचेकडील पत्र क्र.मशा/आस्था/ कार्या-३/ इएनजी/ मानीव दिनांक ३०.०९.२०१५ चे पत्रानुसार या कार्यालयाकडील ज्ञापन क्रमांक ESTT-११०८/१/२०१५ दिनांक ३ नोव्हेंबर २०१५ अन्वये श्री आर.सी..कुडाळकर अ.क्र ५५७ यांचा मानीव दिनांक देणेत आलेला आहे. श्री.कर्पे हे श्री.नाईक यांना सेवाजेष्ठ असलेने त्यांचा मानीव दिनांक देता येणार नाही. त्यामुळे आक्षेप अमान्य करणेस हरकत नाही. | **आक्षेप अमान्य.**<br>मानीव दिनांक हा सेवेने कनिष्ठ असलेल्या कर्मचा-याचा देणेबाबत तरतूद आहे. सेवाजेष्ठ कर्मचा-याचा मानीव दिनांक देणेबाबत तरतूद नाही. सबब आक्षेप अमान्य करण्यात येत आहे. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | आहे. परंतू शासन निर्णयानुसार माझेकडून बंधपत्र घेऊन पदोन्नती देण्याची तरतुद आहे. तशी झालेली नाही व तशी मला संधी देण्यात आलेली नाही. त्यामुळे मला सेवेने कनिष्ठ असलेल्या कुडाळकर हे पदोन्नती मिळूनही दोन महिन्याने दि. 07/10/2010 उशिरा हजर झाल्याने त्याची मला तारीख न मिळता पदोन्नतीच्या बैठकीत पदोन्नत झालेले श्री. जी. व्ही.मेस्त्री यांची 20/07/2010 ची सततची तारीख म्हणून मानीव तारीख मिळावी. | | |
| २ | श्री. एस.बी.यादव,<br>(मंडळ अधिकारी, भुईबावडा) | माझा प्रवर्ग भ.ज.ब असून जात पडताळणी झालेली आहे. तरी जेष्ठता यादीमध्ये खुला प्रवर्ग व जातवैधता रकान्यामध्ये 'वैध' असा शेरा नमूद आहे. तरी जात प्रवर्ग या रकान्यामध्ये खुला ऐवजी भ.ज. ब. दुरुस्ती करणेस विनंती आहे. | कागदपत्रांची पडताळणी केली असता श्री.यादव हे भ.ज.ब प्रवर्गातील असून त्यांची जात पडताळणी झालेली आहे. सोबत जात वैधता प्रमाणपत्र आहे. त्यानुसार जात प्रवर्गामध्ये खुल्या ऐवजी भ.ज.ब. अशी दुरुस्ती करणेस हरकत नाही. | **आक्षेप मान्य.**<br>जात वैधता प्रमाणपत्रानुसार आवश्यक ती दुरुस्ती करणेत आलेली आहे. |
| ३ | श्री.यु.एस.हेळकर मंडळ अधिकारी आजगाव ता.सावंतवाडी | मी मंडळ अधिकारी म्हणून दिनांक २८.५.२०१४ पासून कार्यरत आहे.मी दिनांक १७.१.१९९० रोजी शासन सेवेत हजर झालो असून खात्याची दुयम सेवा परिक्षा विहीत संधीत व मुदतीत पास झालो आहे. श्री.एम.आर.जाधव हे दिनांक १७.८.१९९० रोजी तलाठी संवर्गात हजर झाले असून एप्रिल २००१ मध्ये महसूल अर्हता उत्तीर्ण झाले आहेत. असे असतानाही महसूल अर्हता परिक्षेचा अर्थ चुकीचा लावून श्री.एम.आर.जाधव यांना २१/७/२०१० रोजी पदोन्नती दिलेली आहे.तरी मी ज्या तारखेस मंडळ अधिकारी संवर्गात पात्र् ठरतो त्या तारखेसबंधी पडताळणी करुन मला ज्येष्ठता क्रम मिळण्यास | दिनांक १७.६.२०१० रोजी झालेल विभागीय पदोन्नती समितीच्या बैठकीत श्री.एम.आर.जाधव तलाठी यांची आरक्षणाची पदे रिक्त नसल्याने त्यांना दिनांक २१.६.२०१० रोजीचे आदेशाने मंडळ अधिकारी संवर्गात पदोन्नती देणेत आली आहे.यासाठी दिनांक १/१/२००९ रोजीची तलाठी संवर्गाची संयुक्त ज्येष्ठता सूची विचारात घेण्यात आली होती.सदर ज्येष्ठता यादीनुसार श्री.एम.आर.जाधव हे श्री.हेळकर यांना ज्येष्ठ असलेमुळे ज्येष्ठतेनुसार त्यांना पदोन्नती देणेत आली आहे. अर्जदार यांनी याबाबत मा.अपर आयुक्त कोकण विभाग यांचेकडे अपिल क्रमांक | **आक्षेप मान्य.**<br>आक्षेपानुसार योग्य ती दुरुस्ती करणेत आलेली आहे.<br>श्री.हेळेकर यांना कनिष्ठ असलेले श्री.एम.आर.जाधव यांचा मानीव दिनांक देणेत आलेला आहे. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | विनंती आहे. | अपील/कार्यासन/ईएनजी/०३/२०१४ दाखल केले होते. सदर अपिल दिनांक १३/११/२०१४ अन्वये फेटाळणेत आले आहे.(सोबत प्रत आहे) तथापि श्री. हेळकर हे श्री.एम.आर.जाधव यांना सेवेने ज्येष्ठ असलेने व ते विहीत मुदतीत व संधीत महसूल अर्हता परिक्षा उत्तीर्ण झाले असलेने त्यांचे आक्षेपाचा विचार करणेस हरकत नाही. | |

(तानाजी सत्रे)
विभागीय आयुक्त कोंकण विभाग